# राशिभविष्य - जानेवारी, २०१५.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================

## सर्वांना नव वर्षाच्या शुभेच्छा !

==========================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या संपूर्ण काळात शारीरिक, मानसिक आरोग्याकडे सतत लक्ष द्यावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण विविध कारणांनी मनस्ताप देणाऱ्याघटना घडण्याची दाट शक्यता वाटते. विशेष करून आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वक करा. महिन्याचा पूर्वार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने प्रतिकुल असणार आहे. केवळ परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारानाच अनुकुल व लाभदायक होईल. संबंधी जनांपासून त्रास झाला नाही तर गुरु ग्रहाच्याअनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभू शकेल. काही मंडळी स्थावर खरेदी करतील तर काहीचे स्थावर विक्रीचे व्यवहार समाधानकारक होतील. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीव्यवसायात अनुकुल व लाभदायक घटना घडण्याची दाट शक्यता वाटते. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या प्रतिष्ठित लोकांशी संपर्क येऊन लाभदायक घटना घडण्याची शक्यता वाटते. महिन्याच्या शेवटच्या दहा दिवसांत शुक्र ग्र हाच्या अनुकुलतेने मनोनुकुल लाभदायक घटना घडतील. मूल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. मात्रसध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अत्यंत लहरी, चंचल असा झाला असण्याची शक्यता दिसते. तसे असेल तर वाईट हेतूने गोड बोलून मोहात टाकणाऱ्या तथाकथित मित्रांपासून चार हात दूरच राहा. नपेक्षा “ दैव देते आणि कर्म नेते “ अशी अवस्था होईल. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीगणेश उपासना करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुलअसल्याचाच अनुभव येईल. स्वतंत्रव्यवसाय असणारांपैकी द्रव पदार्थाचे व्यापारी मानसिक रोग तज्ञ , वैद्यकीय व्यवसाय असणारे, औषधंविक्रेते , दलाली, कमिशनवर व्यवसाय करणारे यांनाच काही प्रमाणात काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या साहित्यिकांचे व चिंतनशील विचारवंतांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध

होण्यास काळ अनुकुल होईल. स्व:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वा अन्य कारणाने अपेक्षित वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभण्याची शक्यता दिसत नाही. तसेच मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आच्रणविषयक समस्या अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुखातही बाधा येणे संभवत‍े या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. तसेच बंधुजनाकडून काहीही कारणाने मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. मित्रांशी भांडणे होणे संभवते. जपा. पण गुरू-हर्षल, गुरू-शनि शुभ योगामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. गुरू-हर्षल शुभ योगामुळे अनप‍ेक्षितपणे अर्थलाभ होणेही शक्य आहे. काहीना थोर कृपा तर काहीना कीर्ती -प्रसिद्धीमिळणेही संभवते. महिन्याच्या अखेरच्या दहा दिवसांत स्‍वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर कुल दैवताची उपासना करा. " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देणे अनिवार्य होणार आहे. मनास्तापामुळे गहरे नैराश्य येण्याची शक्यता दिसते. ताप येणे, अपचन होणे, अन्य पोटाचे विकार, मूत्राशयविकार बळावणे अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. जपा. दाम्पत्य जीवनात जीवनसाथीशी वाद, भांडणे यामुळे मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. कौटुंबिक जीवनातही गैरसमज, वाद, मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना आदि कारणांनी अपेक्षित कौटुंबिक सुखही लाभण्याची शक्यता दिसत नाही. जपा. पण ग‍ुरूग्रहाच्या अनुकुलतेने कुटुंबात काही मनोनुकुल व शुभ घटनाही घडतील. तसेच गुरू-शुक्राच्या अनुकुल्तेने धनलाभ, प्रशंसा, भूमिलाभ अशापैकी लाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीचे व मुलांपैकी कोणाचे अनारोग्य त्रस्त करील. नोकरदार मंडळीनाही नोकरीचे ठिकाणी विरोधी परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. या राशीच्या युवकांनी सध्या आहे तो नोकरी-व्यवसायच चालू ठेवावा. नवीन काही करण्याचा प्‍रयत्नही करू नये. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली-सल्लागारी व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र , अशापैकी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास , मनस्ताप होणे संभवते. थोडी अध्यात्म साधना कराल तर मनव बुद्धी स्थिर व शांत राहू शकेल. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. तेव्हा जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधोन घेण्याचा प्रयत्न करा. पण चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली-सल्लागारी व्यवसाय, साहित्यनिर्मिती व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र अशापैकी कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. पण जलभय असल्याने जलप्रव ासकरू नका. तसेच विजेपासूनही धोका होणे संभवते. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काहीना भूमिलाभ तर काहीना धनलाभ, मान, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होणे संभवते. स्वत:चे कर्तृत्व सिद्ध करण्यास काळ अनुकुल होईल. पण बंधुसुखात बाधा येणे शक्य दिसते. जपा. शनि ग्रहाच्या राशीतील अष्टम स्थानी मंगळ ग्रह असल्यामुळे उष्णताविकार बळावण्याची शक्यता असून त्यामुळे मुळव्याधीसारखे आजार होणे संभवते. जपा. तसेच काही मंडळीना कुसंगतीची बाधा त्रस्त करीलसे दिसते. मुलांपैकी कोणास कसला तरी मानसिक त्रास , कोणास आलेले नैराश्य अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री -ग्राहकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे नियमितपणे पठण करा.

**(५) सिंह -** या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ सर्वच बाबतीत प्रतिकुल असल्याचा अनुभव येणे संभवते. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी अहंकार, जिद्द काबूत ठेवून आणि मन व बुद्धी स्थिर, शांत ठेवून सतत सावधानतेने व नम्रतेने आचरण करावे, असे आवर्जून सांगावेसे वाटते. विशेष करून आर्थिक समस्या त्र स्त करतील. शारीरिक कष्ट व दगदग सहन करावी लागेल. काहीना राहत्या जागेची समस्या तर काहीना स्थावरविषयक समस्या त्रस्त करील. पण गुरु ग्रहाच्या . शुभ दृष्टीमुळे परिस्थती आटोक्यात राहील. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या नोकरदार मंडळीना वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. कार्यसिद्धी होईल. पण दांपत्यजीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रक रणे असतील तर ती पुढे

ढकलण्याचा प्रयत्न करावा. काही मंडळीना त्वचारोग, काहीना मुखदंत रोग तर काहीना रक्तविकाराचा त्रास सहन करावा लागणे संभवते. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करावे. सात्विक सुखशांती प्राप्त होण्यासा ठी श्रद्धेने आध्यात्मिक उपासना कराल तर होणारा मनस्ताप सुसहय होईल. श्रद्धेने शिवोपासना व हनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्र ाचेदररोज नियमाने पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात मन व बुद्धीवर ताबा ठेवून आणि सहनशील होऊन आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. तसे घडले तरच गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून योगायोगाने घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा सुखानंद अनुभवू शकतील. कौटुंबिक त्रास , वाद, भांडणे, गैरसमज, चिंता अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य यांत बाधा येणे संभवते. मनस्ताप देणाऱ्या घटनांमुळेच शारीरिक अनारोग्य होणे संभवते. शारीरिक उष्णता भडकून ताप येणे, फोड येणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. जपा. काही जणांना उगीचच आपल्याला काही आजार झाला असण्याची भावना त्रस्त करील. कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा ही मनस्ताप सहन करावा लागेल. वैवाहिक जीवनात जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त वागणे, मतभेद, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी मनस्ताप व दुरावा सहन करावा लागणे शक्य दिसते. भागीदारीत व्यापार व्यवसाय असेल तर संशय, गैरसमज, वाद यांमुळे भागीदारेत बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीनाही नोकरीत जबाबदारी पार पाडण्यात येणारे अडथळे, वरिष्ठांचा कोप सहन करावा लागेलसे दिसते. गुरु-शनि शुभ योगामुळेकाहीना मनपसंत अशी नोकरी प्राप्त होईल, तर काहीना आवडते कार्यक्षेत्र मिळणे संभवते. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकूल प्रगतिकारक व लाभदायक होईल. विद्या र्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. विवाहेच्छू युवकेयुवतीचे विवाह ठरतील वा संपन्न होतील. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध च सर्व दृष्टीनी अनुकुल व लाभदायक होईल. पण आर्थिक समस्या त्रस्त करतील आणि कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत बढती, अधिकारपद, मानाचे स्थान असे काही मिळू शकेल. वरिष्ठ तुमच्या कामावर खूष होतील.

पगारवाढ होईल. सर्व काही मनासारखे घडेल. वैद्यकीय व्यवसाय,औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शेती व्यवसाय असणारांना उत्तम अर्थलाभ होईल. गुणांचेकौतुक होईल. बौद्धिक, शैक्षणिककार्यक्षेत्र, कलाक्षेत्र, शास्त्रीय संशोधन क्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. गुरू-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. काही भाग्यवान मंडळीना परदेशवारीची संधी मिळेल. हितशत्रूपासून रक्षण होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत बदल होईल. कौटुंबिक सुख व दांपत्यजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच संततिसुखातही बाधा येणे शक्य दिसते. वात विकारांनी अनारोग्य वाढेल. काहीना डोकेदुखीचा तर काहीना मेंदूविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. नैराश्य, अयोग्य आचरण अशापैकी कारणांनी संततिसुखातही बाधायेऊ शकेल. अध्यात्माची ओढ असेल तर योग्य गुरुच्या मार्गदर्शनाने आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासनाअनुकूल होईल. दररोज नियमाने श्रीहनुमान स्तोत्राचे पठण करा,

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही बाब सतत ध्यानातघेऊन या राशीच्या मंडळीनी मन व बुद्धीवर ताबा ठेवून व सहनशीलतेने आचरण केल्यासच होणारा मनस्ताप सुसह्य होईल आणि गुरू-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून ज्या मनोनुकुल घटना घडतील त्या सुखशांती देऊ शकतील. शनि - मंगळ कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याचीशक्यता जाणवते. तसेच सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडवून शारीरिक मानसिक अनारोग्य होण्यास कारणीभूत होतील. कौटुंबिक भांडण तंटे, गैरसमज, घडणाऱ्या असमाधानकारक घटना यांनी त्रस्त व्हाल. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या तर काहीना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. हाती घेतलेल्या कार्यात अडथळे निर्माण होतील. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. शारीरिक अनारोग्य होणेही शक्य दिसते. शारीरिक उष्णताभडकून नेत्रविकार त्रस्त करतील. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात फसवणूक, वित्तहानी, वाढता खर्च अशापैकी कारणांनी आर्थिक चिंता त्रस्त करील. नोकरदार मंडळीनी महिन्याच्या पूर्वार्धातनोकरीचे ठिकाणी शांत राहावे व नम्रतेचे आचरण करावे. तेच सुखाचे होईल व महिन्याच्या उत्तरार्धात घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचे सुखसमाधान अनुभवता येईल.

गुरू-हर्षल शुभ योगामुळे गूढ संशोधन व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना प्रगती व यश प्राप्त होईल. शेती व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. अध्यात्माची ओढ असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुख शांती मिळू शकेल श्रद्धेने दररोज नियमितपणे श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा. मन:शांती मिळेल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना नुकतीच शनि ग्रहाची साडेसाती सुरू झाली आहे. त्यामुळे त्यांनी सतत संयम आणि सहनशीलतेने आचरण करावे, हे उत्तम. रवि ग्रह प्रतिकुल असल्याने उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. विशेष करून डोळ्याची दुखणी त्रस्त करण्याची शक्यता दिसते. मनस्ताप देणाऱ्या घटना घडून असह्य मनस्ताप होणे संभवते. त्यामुळे काहीना थकवा जाणवेल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन व बुद्धी शांत ठेवून व मूक व्रत धारण करून आचरण करणेच सुखाचे होईल. तसेच आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल असल्याने प्रिय आराध्य दैवताची उपासना सात्विक सुखशांती देऊ शकेल. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या शनीमुळे या राशीच्या मंडळीनी सर्व आर्थिक व्यवहार व आचरण अत्यंत सावधानतेने व विचारपूर्वक करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना काळ लाभदायक होईल; पण सामान्य नोकरदार मंडळीना मात्र हिमतीने व धैर्याने वागूनच अपेक्षापूर्ती करण्याचा प्रयत्न करावा लागेल. शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल'; पण वर्तमान न पटवून घेण्याच्या स्वभावाला मुरड घालावी लागेल. आहे त्यात सुखसमाधान मानता आले पाहिजे. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचा योग आहे अशांना असा धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक आरोग्याकडे लक्ष विशेष लक्ष द्यावे. कारण विविध कारणांनी असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे गहरे नैराश्य येणे, नको इतके श्रम , दगदग झाल्यामुळे थकवा येणे संभवते. तसेच शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार त्रस्त करण्याची शक्यताही जाणवते. डोळे, मान, घसा, दाढा यापैकी कसला तरी आजार त्रस्त करील. जपा. हृदयविकार, रक्तदाब अशी दुखणी असणारांनी तर मन व

विचारशक्ती शांत व स्थिर राखण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. तेच सुखाचे होईल. तसेच संततीविषयक समस्याही त्रस्त कारील्से दिसते. विशेष करून आर्थिक समस्या अधिक प्रमाणात त्रस्त करतील. जपा. नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. पण उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना मात्र काळ अनुकुल , प्रगत िकारकव यशदायक होईल. तसेच वकिली-सल्लागारी व्यवसाय, कोळसा , लोखंड व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. घरात वाद, भांडणे होणार नाहीत याची काळजी घेता आल्यासच शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभू शकेल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने विवाहेच्छूचे विवाह ठरतील व संपन्न होतील. काही युवक युवतीचे प्रेमसंबंध जुळून येती. तसेच नवे स्नेहसबंध जुळून येणेही संभवते. प्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग संभवतात. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. मानसिक सुखशांती लाभेल.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन कोमल व भावनाप्रधान झाले असण्याची शक्यता दिसते. पण स्वभाव मात्र अहंकारी, हेकट असा झाला असण्याची शक्यता वाटते. बुद्धी अस्थिर, चंचल झाली असल्यास हातून सतत अविचाराने नको ते घडण्याची शक्यता असते. तसेच जिभेला लगाम घालून व सहनशील बनून आचरण करावे, हे उत्तम. क ुसंगतीचीबाधा होणेही संभवते. अविचाराने वागण्यामुळेच आर्थिक चिंता निर्माण होतील. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार असल्याने त्यांनी जे काय साधावयाचे ते पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. मात्र वाममार्ग धन सहज मिळण ेशक्य असले तरी तो मोह टाळणेच सुखाचे होईल. गुरु-शनि शुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र ,शास्त्रीय संशोधन व शैक्षणिक कार्‌यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. स्वतंत्र व्यवसाय असणारांनी कुवतीपेक्षा अधिक मोठे धाडस करू नये. व्यवसायातील वर्तमान स्थितीच व्यवस्थित राखण्याचा प्रयत्न करावा. मंगळ-राहूमुळे काहीही कारणाने वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण शुक्राच्या थोड्या फार अनुकुल्तेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर कुलस्वामिनीची व श्री हनुमानाची उपासना करा. दररोज नियमितपणे श्रीहनुमानचालीसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निमशासकीय नोकरीत असणारांना तर पगारवाढ, बढती, मानसन्मान, उच्च पद असे काही मिळण्याची शक्यताही दिसते. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीयसशोधनात्म्क कार्यक्षेत्र असणारांना काळ खूपच अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. पण हे सुखसमाधान प्राप्तहोण्यासाठी काही पथ्ये पाळावीच लागतील. मुख्य म्हणजे शारीरिक आरोग्य, मानसिक, भावनिक व वैचारिक स्थिरता व शांती लाभून काहीहीकारणाने नैराश्य येणार नाही, यासाठी जपले पाहिजे. व्ययस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते गैरसमजुतीने होणारे वाद, भांडणे टाळण्याचा कसोशीने प्रयत्न झाला पाहिजे. बुद्धी विकृत होणार नाही व मनाला नैराश्य येणार नाही यासाठी जपले पाहिजे. वर्तमान अस्थिर, चंचल, लहरी स्वभावावर नियंत्रण ठेवता आले पाहिजे. इतरांचे बोलणे, उपदेश सहन करता आले पाहिजेत. पंचमस्थानी असणाऱ्या उच्च राशीतील गुरु ग्हामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिकउच्च प्रगतीस काळ अनुकुल होईल. नवे स्नेहसंबंध, प्रेमसंबंध जुळून येतील. धनलाभ होणेही शक्य आहे. दूरच्या प्रवासाचे योग येतील. केवळ वैवाहिक जीवनातील सुखास काळ प्रतिकुल आहे. .पण संयम व सहनशीलता राखू शकलात तर गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने त्या सुखातही फारशी बाधा येणार नाही. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेया ची उपासना करा. “ बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

=====OOO0OOO=====